संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# विकसित भारतापुढची सुरक्षेची चिंता

केंद्र सरकारकडून विकसित भारताचे गुणगान सातत्याने होत आहे. परंतु भारताच्या लष्कर प्रमुखांनी व्यक्त केलेली भीती आणि दिलेला इशारा लक्षात घेतला तर विकसित भारत पूर्णपणे सुरक्षित नाही असाच त्याचा अर्थ काढावा लागतो. दिल्लीमध्ये एका कार्यक्रमात बोलताना लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी पाकिस्तान आणि चीन यांच्या एकत्र येण्यापासून ते पाकिस्तान, चीन आणि बांगलादेशकडून सुरू असलेल्या वेगवेगळ्या कुरापती या भारतासाठी चिंताजनक असल्याचे म्हटले आहे. थेट लष्कर प्रमुखांनीच अशा प्रकारची चिंता व्यक्त केल्याने भारताच्या सुरक्षिततेचा प्रश्न साधारण स्वरूपाचा नाही असाच त्याचा निष्कर्ष निघतो. यापूर्वीचे लष्कर प्रमुख मनोज नरवणे यांनीसुद्धा अशाच प्रकारची चिंता बोलून दाखवली होती. अर्थातच केवळ चिंता व्यक्त करून काम भागणारे नाही यासाठी तशाच प्रकारच्या दूरदृष्टीपूर्ण उपाययोजनांची आवश्यकता आहे. त्यातल्या त्यात गेल्या चाळीस वर्षांपासून भारताला छळत असलेला दहशतवाद संपुष्टात आणण्यात सुरक्षा यंत्रणा आणि लष्कराला यश आले यात काही शंका नाही. सर्जिकल स्ट्राईकच्यानिमित्ताने तर ज्या शेजारी राष्ट्रातून दहशतवाद पोसला जात होता. त्याच्या मूळावरच घाव घातला गेला. अत्यंत उघडपणाने आंतरराष्ट्रीय समुदायाचाही धाक न बाळगता पाकिस्तानने जवळपास वीस दहशतवादी संघटनांना आपल्या छत्रछायेखाली आश्रय दिला होता. एवढेच नाही तर पाकिस्तानातूनच जगातल्या अनेक देशांमध्ये या दहशतवादाची निर्यात सुरू होती. भारताने सर्जिकल स्ट्राईक केल्यानंतर प्रामुख्याने जैश-ए-मोहम्मद या दहशतवादी संघटनेचे शंभरापेक्षा जास्त दहशतवादी ठार झाले होते. आणि भारत दहशतवाद मोडून काढण्यासाठी कुठल्याही टोकाला जाऊ शकतो. असा निर्वाणीचा इशाराही त्यानिमित्ताने दिला होता. आतापर्यंत देशांतर्गत सुरक्षिततेलाही नख लावण्याचे काम पाकिस्तान चीन, बांगलादेश या देशांकडून होत आले. मग अगदी अर्बन नक्षलवाद जोपासण्यापासून ते रोहिंग्या घुसखोरांना थेट देशाच्या राजधानीत पोहोचवण्याची कारस्थाने सुखनैव खेळली गेली. मात्र आता या सगळ्याच कारस्थानांच्या मुसक्या बांधल्या जात असल्याने ते तीनही देश अस्वस्थ आहेत.

### कुरापतखोरांना धूळ चारावी

आतापर्यंत भारताला वाटेल त्या पद्धतीने आपल्या पंजाखाली ठेवण्याचा प्रयत्न चीन पाकिस्तानने केला होता. परंतु भारताने आपल्या मुत्सद्देगिरीचे कौशल्य वापरून जगाला या तीनही देशांच्या कारस्थानांची कल्पना आणून दिली. भारताचे जगातल्या सर्वच प्रमुख राष्ट्रांशी सुधारलेले संबंध आणि त्यांच्याकडून भारताच्या भूमिकेला वेळोवेळी मिळत असलेला पाठिंबा या तीनही देशांच्या नाकाला झोंबणारा ठरला म्हणून हे तीनही देश वेगवेगळ्या पद्धतीने मदत करीत आहेत. भारतविरोधी कारवाया करण्याकरीता शस्त्रास्त्रे पुरवण्यापासून तर काही आंतरराष्ट्रीय संस्थांना हाताशी धरून भारतात कायम अस्थिरता माजवण्यापर्यंतचे प्रयत्न होताना दिसून येतात. काश्मीरमध्ये काही छुटपूट दहशतवादी कल्याणमध्ये सापडलेली शस्त्रे ही चिनी बनावटीची होती. एवढेच नव्हे तर बांगलादेशमध्ये जो काही हिंसाचार घडला किंवा मणिपूरमधल्याही हिंसाचारामध्ये वापरली गेलेली शस्त्रे ही चिनी बनावटीची असल्याचे आढळून आले आहे. म्हणजे अगदी नियोजनपूर्वक पद्धतशीरपणे मोठ्या प्रमाणावर शस्त्र पुरवण्याचे काम हे तीनही देश एकमेकांच्या संमतीने करीत असल्याचे स्पष्ट झाले म्हणूनच लष्कर प्रमुखांनी या तीन देशांना एकत्र येणे भारतासाठी गंभीर चिंतेचा विषय ठरतो आहे. शत्रूराष्ट्रांच्या कोणत्याच कारवाईला संधी मिळू नये म्हणून भारतीय लष्कर डोळ्यात तेल घालून सीमांची सुरक्षा करीत आहे. परंतु आवश्यकत्या मनुष्यबळाशिवाय आधुनिक शस्त्रास्त्रांचे बळ खूप महत्त्वाचे ठरते. ड्रोन टेक्नोलॉजीशिवाय लढाऊ विमाने आणि पाणबुड्या यांची संख्या दुप्पट होणे ही काळाची गरज ठरते आहे. म्हणूनच विकसित भारताचे स्वप्न रंगवताना विकसित देशांकडे असलेली आधुनिक शस्त्र संपदा भारताकडे असणे तितकेच महत्त्वाचे ठरते. आज मनुष्यबळाच्याबाबतीत तीनही संरक्षण दलांमध्ये समाधानकारक स्थिती आहे. तरीदेखील ती स्वयंपूर्ण नाही. या मनुष्यबळाचा कौशल्यपूर्ण वापर करायचा असेल तर आधुनिक शस्त्रसामुग्री खूप मोलाची ठरते. जसे कारगिल युद्धाच्यावेळी राफेल विमान असते तर आपली मनुष्यहानी किंवा अनेक जवानांचे हौतात्म्य वाचू शकले असते.

### आक्रमक मुत्सद्देगिरी हवी

भविष्यकाळातील म्हणजे पुढच्या पंचवीस वर्षांचा विचार केला तर पाकिस्तान, चीन, बांगलादेश या तीनही देशांकडून भारताला सुखी शेजार मिळेल अशी शक्यता नाही. याउलट जितकी करडी नजर ठेवली जाईल तेवढा हा शेजार सुखी राहू शकेल. अगदी गेल्या पाच वर्षांतसुद्धा ३७० कलम रद्द करण्याचा निर्णय म्हणजे पाकिस्तानच्या मुजोरीपणाला दिले गेलेले शेवटचे दणदणीत उत्तर होते. आणि गलवान खोऱ्यात जाणुनबुजून गोंधळ माजवणाऱ्या चिनी सैन्याला धडा शिकवण्यात भारतीय लष्कराने बजावलेली कामगिरी एकाअर्थी ऐतिहासिकच ठरलेली आहे. या दोन्ही घटनांमधून भारताकडे सामर्थ्य आहे. परंतु त्याला आधुनिक शस्त्र सज्जतेची आवश्यकता आहे. अचानकपणे कोणतेही संकट उद्भवले तर या आधुनिक शस्त्रास्त्रांच्या जोरावर भारताचे हे सामर्थ्य आणखी नवा प्रताप करू शकते. या सगळ्या पार्श्वभूमीचा विचार केला तर लष्कर प्रमुखांनी व्यक्त केलेली चिंता दुर्लक्षित करून चालणार नाही. लष्करी सामर्थ्याबरोबरच मुत्सद्देगिरीच्या माध्यमातूनही या कुरापतखोरांना धूळ चारता येऊ शकते. परराष्ट्र मंत्री जयशंकर यांना लंडनमध्ये एका मुलाखतीत प्रश्न विचारला गेला आणि पाकिस्तानबरोबरच्या संबंधांविषयी छेडले गेले त्यावेळेला जयशंकर यांनी पाकिस्तानने चोरलेला काश्मिरचा चोरलेला भाग भारताला परत करावा म्हणजे भारत-पाकिस्तान संबंध किंवा काश्मीर समस्या कायमची सुटू शकेल. म्हणजेच मुत्सद्देगिरीच्या माध्यमातून भारत पाकव्याप्त काश्मीर घेण्याच्याही तयारीत आहे असा संदेश दिला गेला आहे. मुत्सद्देगिरीतील अशी आक्रमकता लष्कर प्रमुखांची चिंता कमी करायला सहाय्यभूत ठरू शकेल.